## प्रसिध्दी पत्रक

**दिनांक ०१/०७/२०२४**

**आरोपी लोकसेवक**- दीप दौलतराव बागुल, वय 39 वर्षे, पद- निरीक्षक (वर्ग-3), नेमणुक- धर्मदाय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदार यांच्याकडून फोन गुगल पे द्वारे 2000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस टाणे | :- | पोलीस ठाणे कन्नड ग्रामीण,छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण) गुरनं. 130/2024 कलम 7 भ्र.प्र.अ.1988 अन्वये गुन्हा दाखल केला आहे. |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | :- | दीप दौलतराव बागुल, वय 39 वर्षे, पद- निरीक्षक, धर्मदाय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर रा. प्लॅट नं.103 रामगोपालनगर श्रीरामपार्क, छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागणी रक्कम | :- | 2000/- |
| लाच स्विकृती रक्कम | | 2000/-रुपये. फोन गुगल पे द्वारे. |
| सापळा अधिकारी | :- | श्री. गोरखनाथ गांगुर्डे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे कालीमठ ट्रस्ट (उपळा) येथील दान पेटी विश्वस्त व ग्रामस्थ प्रतिनिधी समक्ष उघडून त्यातील दान रक्कम बँक खात्यावर जमा केल्यानंतर मोबदल्यात खर्चपाणी म्हणून. |
| थोडक्यात माहिती | | यातील तक्रारदार यांचे कालीमठ ट्रस्ट (उपळा) येथील दान पेटी विश्वस्त व ग्रामस्थ प्रतिनिधी समक्ष उघडून त्यातील दान रक्कम बँक खात्यावर जमा केल्यानंतर मोबदल्यात खर्चपाणी म्हणून आरोपी लोकसेवक श्री. दीप दौलतराव बागुल यांनी तक्रारदार यांचेकडे 2000/- लाचेची मागणी करुन आ.लो.से. दीप बागुल यांनी स्वत: चे मोबाईल क्रमांकावर असलेल्या फोन पे द्वारे दि. 26/9/2023 रोजी दुपारी 15.29 वा. तक्रारदार यांच्याकडून तक्रारदारांच्या गुगल पे द्वारे स्वीकारली व त्याची कोणतीही पावती दिली नाही. म्हणून पोलीस स्टेशन कन्नड ग्रामीण, ता. कन्नड जिल्हा छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण) येथे गुरनं. 130/2024 कलम 7 भ्र.प्र.अ.1988 अन्वये गुन्हा दाखल केला आहे |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मुकुंद आघाव, पोलीस उप अधीक्षक राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक गोरखनाथ गांगुर्डे यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोलीस हवालदार दिगंबर पाठक, राजेंद्र सिनकर, भिमराज जिवडे, चालक चंद्रकांत शिंदे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर
ई. मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 9881460103
पोलीस उप अधीक्षक :- 9823498777

( राजीव तळेकर )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.